ज्ञान आणि आनंदाचे साधन

आजच्या मोबाईलच्या युगात आपणास वाचनाचे महत्व कमी झाल्याचे जाणवते. नवीन पिढी आपल्याला वाचनापासून दूर झालेली दिसते. पहिली मुले छोटी गोष्टीची पुस्तके जसे की, चाचा चौधरी चांदोबा, रामायण, महाभारत या सारखी मुलांना आवडणारी मासिके मुले वाचतांना आपणास कुठे दिसत नाही. 'वाचनालयात सुध्दा सर्व वयोवृध्द मंडळी आपणास दिसतात. मुलांच्या हातात आपल्याला आता मोबाईल दिसतात. पण आपणास पुस्तके दिसत नाही.



'किताबे इसलिए पढो
ताकी तुम लोगो से बहस नही
तर्क कर सको'

वाचन मनुष्यास विचार करण्यास भाग पाडते. बृध्दिचा विकास करते. नियमित येणारे वर्तमानपत्र, गोष्टीची पुस्तके, कांदबऱ्या, कविता, ग्रंथ, साप्ताहिक अशा अनेक गोष्टीचे वाचन आपण करू शकतो. वाचनामुळे आपल्याला सभोवती घडणाऱ्या गोष्टी या सर्व घडामोडीची माहिती आपणास मिळते. आपल्या ज्ञानात भर पडते. आपल्या आयुष्याला योग्य ती दिशा मिळते. पु. ल. देशपांडे, व. पु. काळे यांची पुस्तके एकांतात तर भान हरपते आपल्यातील सर्व नकारात्मक उर्जा निघून जाते. तशीच सुधा मुर्तीजींची पुस्तके वाचतांना आपल्यामध्ये आत्मविश्वासाची भावना निर्माण होते. काही लेखकांची पुस्तके वाचताना जो आनंद मिळतो तो तर शब्दात सांगण्यासारखा नाही ते तर वाचता वाचता आपल्याला त्या जगात नेवून सोडतात असा हा वाचनाचा आनंद आपणास वाचनातून मिळतो. कधी कधी तर बाल साहित्य वाचतांना आपणही लहान मुल झाल्यासारखे वाटते तो अनुभव आनंद हा वेगळाच वाटतो.

आज आपल्या देशात जेवढे थोर पुढारी होवून गेले त्यांनी सर्वांनीच वाचनातून प्रेरणा घेतली. राजगुरू, भगतसिंग फाशीच्या शेवटच्या क्षणापर्यंत वाचत राहिले. डॉ. नानासाहेबांनी तर१९३५ मध्ये मुंबईमध्ये पुस्तकांची सोय लावण्यासाठी राजगृह बांधले नेपोलियनने किती पुस्तके वाचली याची तर फ्रान्सने नोंद ठेवली आहे.

आज आपल्या १५ ऑक्टोंबर हा दिवस भारतरत्न अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा करतो कारण हेच की वाचनाचे महत्व सर्वांना समजावे. वाचनातून एक सुजाण नागरिक घडावा.

आपल्याला नवीन शब्दाची ओळख होते. शब्दांची मांडणी कशी करावी, लेखन कसे करावे हे सगळे आपणास वाचनातून कळते. आपला स्वत: व्यक्तीमत्व विकास करण्यासाठी वाचन हे एक उत्तम साधन आहे.

प्रत्येक व्यक्तीचा एक छंद असतो. कुणाला गायन, कुणाला वादन, कुणाला वाचन, पुस्तकाची आपली मैत्री झाली की, आपल्याला वाचनाची आवड निर्माण होते. त्यामुळे वाचन हा एक आपला छंद बनतो. वाचनात रमले की आपले मन एकाग्र होते. दुसरे कोणते वाईट विचार मनात येत नाही. आपले मन एकाग्र होते. मनुष्याजवळ सर्वात मोठी असणारी शक्ती म्हणजे ज्ञान ती आपल्याला वाचनातून मिळते. मिळालेले ज्ञान हे कधीही वाया जात नाही. ज्ञानाचा उपयोग आपण शालेय जीवनात तसेच दैनंदिन जीवनातही होतो. वादविवाद स्पर्धा किंवा इतर अन्य ठिकाणी आपण आपले मुद्दे ठामपणे मांडू शकतो. वाचनामुळे आत्मविश्वास वाढतो. जसे पोटाची भूक भागविण्यासाठी आपल्याला अन्नाची गरज आहे तशीच मेंदूची भूक भागविण्यासाठी वाचनाची आवश्यकता आहे. वाचनामुळे मेंदूला चालना मिळते.

काही पुस्तकामध्ये लेखकांनी त्यांचे अनुभव उत्कृष्ट शब्दात मांडलेले असतात. ते विचार वाचून आपल्यामध्ये सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होतो जसे की शरद पोंक्षे, प्रभाकर पणशीकर व इतरही काही पुस्तके वाचून ते नेहमी म्हणायचे आपल्या देशाचा विकास व्हावयाचा असेल तर विद्यार्थ्यांनी वाचनाची व विज्ञानाची कास धरावयास हवी. लहानपणापासून मुलांना वाचनाची आवड लागावी म्हणून आपण सर्वांनी एक दिवस मोबाईल बंद ठेवून आई वडिलांनी वाचन दिवस पाळण्यास काही हरकत नाही.

● सौ. स्मिता दिवाण
बडनेरा, मो. ९४०४१०४५४७

वैश्विक मानवी मूल्ये- एक प्रस्तुत उपक्रम..!

नुकताच महिला महाविद्यालयामध्ये वैश्विक मानवी मूल्ये या विषयावर डॉ. संदीप ताटेवार यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न झाला. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून सेवानिवृत्त झालेल्या ताटेवार यांनी वैश्विक मानवी मूल्ये या विषयावर सुरेख व्याख्यान दिले.त्यांनी आजतागायत या विषयावर विविध महाविद्यालयांमध्ये व्याख्याने दिली आहेत. विद्यार्थ्यांमध्ये मानवी मूल्यांची रुजवणूक व्हावी, त्यांना वैश्विक मानवी मूल्यांची ओळख व्हावी, एक सृजन, संपन्न,जागरूक आणि मानवतावादी नागरिक म्हणून विद्यार्थी घडावा हा उद्देश त्यांचा या व्याख्यानामागे दिसून आला. अतिशय सरळ सोप्या भाषेत त्यांनी विद्यार्थिनींना वैश्विक मानवी मूल्य समजावून सांगितले.शेतकरी ज्याप्रमाणे आपल्या शेतीतून अधिक आणि सकस उत्पन्न प्राप्त करण्याकरिता जमिनीची आधी चांगली मशागत करतो त्याचप्रमाणे विषयाला सुरुवात करण्याआधी त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनाची मशागत केली आणि वैश्विक मानवी मूल्य जाणून घेण्याबद्दल त्यांच्यामध्ये जिज्ञासा निर्माण केली.

वैश्विक मानवी मूल्ये कार्यक्रम घेण्यामागची भूमिका आणि या कार्यक्रमाचे निवेदन करण्याची जबाबदारी माझ्यावर असल्यामुळे मी मूल्य म्हणजे काय,आजच्या परिस्थितीत मूल्यांची नितांत आवश्यकता का आहे, यावर भाष्य केले. सध्याचे युग हे विज्ञान-तंत्रज्ञान बरोबरच कौशल्याचे युग आहेत, परंतु असे असले तरी विज्ञान व तंत्रज्ञानाला आणि कौशल्याला न्याय भूमिकेतून हाताळण्यासाठी मूल्यांची गरज आहे. मूल्य म्हणजे काय तर जीवनासंबंधीची धारणा, तत्वे, नियम, पात्रता, दर्जा होय. मूल्य म्हणजे किंमत आणि किंमत या अर्थाने मूल्य म्हणजे उपयुक्तता होय. एखाद्या वस्तूच्या उपयुक्तते वरून ज्याप्रमाणे तिची किंमत ठरते तेव्हा त्याला मूल्य असे म्हणतात. मानवी मूल्य म्हणजे समाजाने आदर्श जीवन जगण्यासाठी तयार केलेली नियमांची चौकट होय, तर वैश्विक मानवी मूल्य म्हणजे देशा देशांतर्गत प्रस्थापित सीमांच्या पलीकडे जाऊन विश्वातील सर्व मानवी समुदायांच्या जीवनाकरिता उपयुक्त आदर्श तत्वे होय. इस.पूर्व ५३९ ते ४८३ या काळात स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा आदर्श गौतम बुद्धांनी समस्त जगाला दिला. १७८९ मध्ये फ्रान्सने मानवी आणि नागरी हक्काचा जाहीरनामा स्वीकारला तो देखील स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांवर आधारित आहे. भारतीय संविधानाची

उद्देशपत्रिका जीला संविधानाचा आत्मा असे म्हणतात त्यामध्ये सुद्धा न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मानवी मूल्यांना महत्त्वाचे स्थान आहे. या सोबतच सत्य,अहिंसा, सदाचार, सहिष्णुता, सहकार्य, मानवता, स्नेह, विश्वशांतता ही देखील मानवी मूल्य आहेत. वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांनी सांगितलेली दशसूत्री देखील मानवी मूल्यांनी भरलेली आहे. भुकेल्यांना -अन्न, तहानलेल्यांना- पाणी, उघड्या नागड्यांना -वस्त्र, गरीब मुला- मुलींना -शिक्षणासाठी मदत बेघरांना- आसरा, अंध अपंग रोगी यांना-औषधोपचार, बेकारांना -रोजगार ,पशुपक्षी मुक्या प्राण्यांना- अभय, गरीब तरुण-तरुणींचे -लग्न, दुखी व निराशांना- हिम्मत, गोरगरिबांना- शिक्षण हे देखील मानवी मूल्यच आहे.भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी मानवाने आपले जीवन जगताना सात सामाजिक पापांपासून दूर राहावे असे म्हटले आहे, ते म्हणतात श्रमाशिवाय- संपत्ती, मानवतारहित- विज्ञान, नीतीविहीन- व्यापार, सिद्धांताशिवाय- राजनीती, विवेकाशिवाय- सुख, त्यागाविना- पूजा, चरित्र विना-शिक्षण म्हणजे एक प्रकारचे पापच होय.गांधीजींच्या या तत्त्वांमध्ये वैश्विक मानवी मूल्य सामावलेली आहे. १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये मूल्य शिक्षण स्वतंत्रपणे अमलात आणल्या गेले, तसेच १९९७ पासून महाराष्ट्र शासनाने शालेय पातळीवर मूल्य शिक्षणाला प्राधान्य दिले, ज्यामध्ये श्रमप्रतिष्ठा, संवेदनशीलता, वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा, स्त्री पुरुष समानता, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्वधर्म सहिष्णुता, सौजन्यशीलता, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता ही दहा मूल्ये अंतर्भूत आहे.

माझ्या प्रास्ताविकपर विचारांना विराम देऊन कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ.संदीप ताटेवर यांनी मांडलेली नऊ वैश्विक मानवी मूल्ये आणि त्याची क्रमबद्धता मनाला स्पर्श करून गेली. डॉ संदीप ताटेवार यांनी आपल्या व्याख्यानाला सुरुवात करताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये वैश्विक मानवी मूल्यांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे असे सांगून त्यांनी नऊ वैश्विक मानवी मूल्ये उदाहरणासहित स्पष्ट करून सांगितली ती याप्रमाणे होती, १)विश्वास २)आदर ३)स्नेह ४)ममता ५)वासल्य ६)श्रद्धा ७)गौरव ८)कृतज्ञता ९)प्रेम. नऊ मूल्यांच्या या क्रमबद्धतेमध्ये प्रेम हे मूल्य सर्वात शेवटी आहे. मानवी मूल्यासंबंधी आपण सहजच प्रथम प्रेम हे मानवी मूल्य सांगून जातो, परंतु प्रेम हे मूल्य एवढ्या सहजासहजी निर्माण होत नाही. विश्वातील सर्व मानवाबद्दल प्रेम निर्माण होणे याकरिता ताटेवार यांनी वैश्विक मानवी मूल्यांचा जो क्रम सांगितला तो खरोखरच महत्त्वाचा आहे.प्रेम हे मूल्य विकसित होण्याकरता प्रथम आपल्या मनात विश्वास पाहिजे, आदर पाहिजे, स्नेह पाहिजे, ममता पाहिजे, वासल्य, श्रद्धा, गौरव, कृतज्ञता पाहिजे आणि तेव्हा कुठे प्रेम निर्माण होते. म्हणूनच प्रेम हे पवित्र मूल्य आहे. ते विश्वास, आदर, स्नेह, ममता, वासल्य, श्रद्धा, गौरव, कृतज्ञता इत्यादी मूल्यांनी परिपूर्ण आहे.

व्यक्तीकडे माणूस म्हणून बघितलं की प्रेम आपोआप अंकुरित होते. जात, धर्म, भाषा, प्रदेश, सीमा यांच्या पलीकडे ते निघून जाते. इतरांबद्दल मनात प्रेमाची भावना ठेवली की विश्वास, आदर, स्नेह,ममता, वासल्य, श्रद्धा, गौरव, कृतज्ञता ही सर्व मूल्ये प्रेम रुपी इंजनीच्या मागे डब्यासारखी आपोआप येतात. इथे असेही म्हणता येईल की विश्वास, आदर, स्नेह, ममता, वासल्य, श्रद्धा, गौरव, कृतज्ञता हे सर्व डबे एकाला एक जोडल्यानंतर शेवटी त्याला प्रेम रुपी इंजन लावून वैश्विक मानवी मूल्याची ही ट्रेन विश्वभर मानवतेचा प्रवास अधिक वेगाने आणि आनंदाने करू शकेते ही शिकवण विद्यार्थ्यांना मिळाली.

वैश्विक मानवी मूल्ये या कार्यक्रमातून साने गुरुजींचा खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे या प्रार्थनेची आठवण झाली आणि या कार्यक्रमातून विश्व स्नेह का ध्यान धरे, सबका सब सन्मान करे हा बोध मिळाला. नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या अध्यक्ष डॉ.माया शिराळकर मॅडम यांच्या प्रेरणेमुळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील सरांच्या मार्गदर्शनामुळे तसेच डॉ.मंजुषा धापुडकर यांनी या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून भूमिका पार पाडल्यामुळे इतक्या सुंदर कार्यक्रमाचे आयोजन करता आले त्याबद्दल त्यांचे व प्रमुख मार्गदर्शक डॉ. संदीप ताटेवार सरांचे मनस्वी आभार!

● प्रा.डॉ. प्रवीण ज. गुल्हाने
महिला महाविद्यालय,अमरावती
मो. न.९३२५६३०९६६

कविकुलगुरू कालिदास विरचित

रघुवंशम्

विद्यावाचस्पती
प्रा. स्वानंद गजानन पुंड
९८२२६४४६११

२९३) सर्ग ४ श्लोक ५३

तस्यानीकैर्विसर्पद्भिरपरान्तजयोद्यतैः।। .
रामास्त्रोत्सारितोऽप्यासीत्सह्यलग्न इवार्णवः ।। ५३ ।।

पश्चिम दिशेच्या विजयासाठी निघालेल्या त्याच्या सेनेने परशुरामांच्या अस्त्रांनी मागे सरकवलेला असूनही समुद्र जणू सह्य पर्वताला लागूनच वाटला.

अपरांत म्हणजे पश्चिम दिशा. त्या दिशेवर जयोद्यत म्हणजे विजय मिळवण्यासाठी सिद्ध झालेली, विजय मिळवण्याची इच्छा असलेली, तस्य म्हणजे त्या महाराज रघुंची अनीक म्हणजे सेना विसर्पद्भि म्हणजे समोर सरकत असताना. राम म्हणजे परशुरामांच्या अस्त्रांनी उत्सारित म्हणजे दूर केलेला, अपि म्हणजे असला तरी, अर्णव म्हणजे समुद्र संय पर्वताला लग्न म्हणजे जुळूनच असल्यासारखा वाटला.

सह्य पर्वताच्या पश्चिमेकडून अर्थात शूर्पारक भूमी म्हणजे पश्चिम किनारपट्टीवरून महाराज रघुची सेना जात असताना त्या सैन्याच्या गमनरूपी लाटांनी जणूकाही ती सेना समुद्राप्रमाणेच वाटली आणि पर्वत तिच्या जवळ वाटला.

दुसऱ्या दृष्टीने सेना इतकी प्रचंड होती की एक टोक पर्वताजवळ आणि एक समुद्राजवळ त्यामुळे जणू काही पर्वत समुद्राच्या जवळच असल्यासारखा वाटला.

काय अफाट झेप आहे महाकवींच्या प्रतिभेची.

मा. तुषार भारतीय यांच्या हस्ते अमरावती जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धेचे बक्षीस वितरण

अमरावती दि. १४: स्व. सविता बक्षी चॅरिटेबल ट्रस्ट व अमरावती चेस असोसिएशन तर्फे आयोजित अमरावती जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात एकूण ५२ प्रतिस्पर्ध्यांनी सहभाग नोंदविला ज्यात सर्व वयोगटातील स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. ह्यात सर्वात कमी म्हणजे ६ वर्ष व सर्वात जास्त ५५ वर्षाच्या स्पर्धकांनी सुद्धा सहभाग नोंदविला ज्यात विजेत्यांना ३२ पारितोषिक यांचे वितरण करण्यात आले. सुहृद आचार्य याने प्रथम क्रमांक पटकाविला मंदार बक्षी यांनी द्वितीय, हिमल दोडेजा यांनी तृतीय, आरव लढ्ढा यांनी चतुर्थ क्रमांक पटकाविला.

बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाला अमरावती महानगर पालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती मा. तुषार भारतीय, स्व.सविता बक्षी चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष गिरीश बक्षी, मुकुंद लढ्ढा, डॉ. सरिता सारडा, प्रशांत हिरपूरकर यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

विजेत्यांचे आयोजकांतर्फे अभिनंदन करण्यात आले. निवड झालेले स्पर्धक २६/२७ ऑक्टोबर रोजी नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय निवड स्पर्धमध्ये अमरावती जिल्हयाचे प्रतिनिधित्व करतील.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंदार बक्षी यांनी केले

राष्ट्रीय योगासन स्पर्धेमध्ये योगपटूंचे सुयश

अमरावती दि. १४ : श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडलद्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन अमरवती, भारतीय ज्ञान परंपरा केंद्र व बृहन महाराष्ट्र योग परिषद (महाराष्ट्र ओलंपिक असोशिएशन मान्यता प्राप्त) यांच्या संयुक्त विद्यमाने ३ री राष्ट्रीय खुली योगासन स्पर्धा दिनांक छै सप्टेंबर रोजी योगशास्त्र विभाग,डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एजुकेशन अमरावती या ठिकाणी स्पर्धा पार पडल्या.तिसऱ्या राष्ट्रीय योगासन स्पर्धा मधे पर्तीश लाईफ लाईन योगा नॅचरोपॅथी युथ स्पोर्टस बहुउद्देशीय संस्थाच्या अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला विद्यार्थ्यांनी आपला विजयी दबदबा कायम ठेवला त्यामध्ये सर्वात छोटा वयोगट ६ ते ८ मुलींमध्ये संयुक्तरित्या आनंदी गावंडे हिने (कांस्यपदक) तिसरा नंबर, शिवश्री चोबे (कांस्यपदक) तिसरा नंबर, सेजल गुप्ता चौथा नंबर. वयोगट ८ ते १४ मुलांमध्ये आरव घोरमाडे तिसरा नंबर (कांस्यपदक), अमेय पांडे चौथा नंबर, वयोगट १४ ते १८ मुलांमध्ये पर्तीश काटोले पहिला नंबर (गोल्ड मेडल), कृष्णा सावंत तिसरा नंबर (कांस्यपदक). वयोगट १४ ते १८ मुलींमध्ये श्रेया गुबंळे (चौथा नंबर), वयोगट २८ ते ३५ महिलांमध्ये नीलिमा चौबे (चौथा नंबर) आयोजक पदश्री प्रभाकररावजी वैद्य (प्रधान सचिव श्री ह. व्या. प्र. मंडल, अम.), डॉ माधुरी चेंडके (मुख्य समन्वयिका, भकरतीय ज्ञान परम्परा केंद्र, अमरावती), डॉ श्रीनिवास देशपांडे (प्राचार्य, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एजुकेशन अमरावती), डॉ अरुण खोडसकर(सरकार्यवाह, बृहन महाराष्ट्र योग परिषद), डॉ सुनील लबड़े (योगशास्त्र विभाग प्रमुख व आयोजन समिती सचिव, ३ री राष्ट्रीय खुली योगासन स्पर्धा), श्री नितिन काळे, डॉ मयूरेश शिंगरूप (समन्वयक / ३ री राष्ट्रीय खुली योगासन स्पर्धा) डॉ विशाल खोड़स्कर (सचिव, अमरावती डिस्ट्रिक्ट योगासन स्पोर्ट असोसिएशन) व प्रा. संदीप मांदळे यांनी स्पर्धा पार पाडण्याकरिता अथक परिश्रम घेतले तर खालील प्राध्यापक वर्ग यांनी त्या ठिकाणी जेस म्हणून खूप महत्त्वपूर्ण भूमिका निभावली प्रतीक पाथरे, प्रा. सुप्रिया चकोले, श्रीमती. स्वातीताई गडेकर, जयश्री काटोले, प्रा. सागर हाटे प्रा. उज्वला सुरजे, मिताली गंगथडे, अनुमित कुमार, श्रीमती. रेखा चव्हले, प्रतिभा ढोक, प्रा. संतोष चंदेल, आकाश सदंशिव, चेतना देशमुख, किसन देशमुख, निखिल ठाकुर, प्रेमदास पकड़े, शिल्पा देवहारे हर्ष त्यागी, गोकुल सोलकर, प्रा संपदा अगरकर, विजय गांजरे, प्रणय पवार, प्रा पुष्पक खोंडे, प्रा वैशाली केने विजयी खेळाडू या सर्वांचे श्रेय ते आपल्या मॅडम./ सॉ. जयश्री काटोले यांना देतात या संस्थेचे पदाधिकारी व सभासद स्रौ.जयश्री काटोले, विजय खोकले सर, मुकुंद काटोले, सतीश भाऊ अग्रवाल, संदेश गिरी सर, सौ. सुवर्णा भुयारकर तसेच हर्षल दलाल यांनी या सर्वांचे कोतुक केले आहे

ज्येष्ठ शास्त्रज्ञ, माजी राष्ट्रपती, मिसाईल मॅन व भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम

भारत मातेचा थोर सुपुत्र, भारताच्या क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक, ज्येष्ठ शास्त्रज्ञ व प्रतिभावंत व्यक्तिमत्वामुळे जग किती प्रभावित होते याची कल्पना येईल. असामान्य तत्वावर साधेपणावर व बौध्दिकतेवर तसेच मनमिळावू स्वभावावर उत्तम कामगिरी करण्याची जिद्द व प्रामाणिकपणा ज्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये सदैव आढळून येतो ते म्हणजेच भारताचे माजी राष्ट्रमती स्वर्गीय डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हे होय. त्यामुळे संपूर्ण विश्व त्यांचेशी परिचित होते. पुज्य आई वडिलांकडून जन्मजात मुलं काही वैशिष्टये घेवून येतात, आजुबाजुच्या परिसरातील सामाजिक, आर्थिक व भावनात्मक वातावरणात त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडण-घडण होते. मंदिराच्या गाभाऱ्यात लखलखणाऱ्या तेजस्वी दिव्याच्या ज्योतीने जसा मुर्तीचा चेहरा चमकतो व निरव शांत प्रकाश देतो त्याच प्रमाणे डॉ. अब्दुल कलाम यांनी भारतदेशाला विकासाच्या प्रकाशाकडे नेण्याचे विशेष व महान कार्य केले.



मद्रासच्या अभियांत्रीकी महाविद्यालयामध्ये प्रवेश यादीत नाव आले पण पूज्य वडिलांकडे त्यावेळेस हजार रुपये सुध्दा नव्हते. शंख, शिपले, वर्तमानपत्रे विकून शिक्षण घेणारे तसेच बहिण जोहरा अभिमानाने त्यांच्या पाठीशी उभी राहत, वेळप्रसंगी सोन्याच्या बांगड्या व साखळी गहाण ठेवून त्यांनी रक्कम उभी केली आणि सेंट जोसेफ रामनाथ पुरम येथे इ.स. १९५४ ते १९६० पर्यंत त्यांनी शिक्षण पूर्ण केले.

विज्ञानात बुध्दी हृदयाला मारून टाकायची शक्ती आहे. विज्ञानाचा सखोल अभ्यास शेवटी मानवाच्या बुध्दीचा विकास करतो, बुध्दी व्दिगुणित होऊन आध्यात्मिक उंचीला वाढविते तथा श्रेष्ठ करते. जगातल्या महान वैज्ञानिकापैकी मात्र कमालीचे शांती प्रिय शांततेचे पुजारी, लहान पणापासुनच पुस्तके वाचण्याची मनापासून आवड, विनयशील, सदा प्रसन्न, कुठेही कटुता नाही, गर्व नाही, वृक्ष प्रेमी, पर्यावरण प्रेमी, संगीत प्रेमी, विज पाण्याच्या समस्या समर्थपणे सोडविणे, सकारात्मक विचारवंत, कपाळावर रूळणारे ते रूपेरी केस, चमकदार पाणीदार डोळे, सतत चेहऱ्यावरील मधूर हास्य तसेच झळकणारी अमर्याद इच्छा शक्ती असे देशाचे लाडके व सर्वांना आवडणारे डॉ. अब्दुल कलाम हे एक होते. त्यांचे राष्ट्रप्रेम, माणुसकी, कमी खर्च करून देशी बनावटीचे क्षेपणशास्त्र, आकाश, त्रिशुल व नाग, ब्रम्हास्त्र, पृथ्वी व अग्नि सारख्या दिर्घ पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची निर्मिती सोबतच पी. सी. व्ही.- ३, फायटर विमान, पोखरण मधील १९९८ ची परमाणू चाचणी, अंतरिक्षातील व संरक्षणातील संशोधन, संरक्षण सल्लागार, पंतप्रधानांचे सल्लागार, उत्तम दर्जाचे अभ्यासपूर्ण व्याख्यान देणारे वक्ते, शिक्षक तथा प्राधापक व शेवटी विद्यार्थांसमोर शिलाँग येथे व्याख्यान देतांना मृत्यू, ज्ञान देण्याचे कार्य करतांना जीवनाचे अंतिमही गोड झाले.

त्यांचे अग्निपंख, इग्नायटेड माईटस, इंडिया २०२० इत्यादी लिखाणातून विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षक व प्राध्यापक यांना सतत प्रेरणा मिळायच्या हे विशेष. तत्कालिन पंतप्रधान स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांनी त्यांचे नाव पुढे केल्याने शास्त्रज्ञ असलेल्या कलामांना राष्ट्रपती पदाची चालुन संधी आली. कोणतेही विरोधक पुढे न येता त्यांनी मोठ्या स्वाभिमानाने आपला राष्ट्रपती पदाचा कार्यकाळ उत्तमरित्या पुर्णत्वास नेला.

अखंण्ड भारत देशाला समर्पित अशा थोर राष्ट्रभक्तांला दि. १५ ऑक्टोंबर २०२४ रोजीच्या ९३ व्या जयंती दिनानिमित्य यथोचित त्रिवार नमन व मानाचा मुजरा ...

● अभियंता अविनाश कृ. राजगुरे
अमरावती., मो. क्र. ९३२६९२५५३१

मना सज्जना.....९४

विचार ही एक गती आहे. आणि त्यामागे हेतूही असतो. गति आणि हेतु एकत्र प्रवास करतात. शाबासकी आणि रट्टा, यात हेतुशिवाय काय फरक? आपण शब्द बोलत नसतो, तेव्हा वेव्हज् थांबवू शकतो का डोक्यातल्या? नाही. म्हणून, चांगल्या संगतीत रहा. ज्ञानी माणूस शक्ती देण्याचं त्याचं काम अबोलपणे करत असतो. तुम्ही तुमचे काम करायला पाहिजे. तुम्ही ज्या प्रमाणात निष्ठेने काम कराल, संकल्पाने प्रयत्न कराल, तसं तुम्हाला मिळेल. तुम्ही घ्या. श्रद्धा ठेवलीत, तर सगळ मिळेल. शंका घेतल्यात, तर शंकाच दिसतील.

आपल्याला दोन्ही बाजूने विचार करायचा आहे. एकतर खूप लोकांनी एकत्र यावं किंवा फक्त दोनच व्यक्ति, घेणारा व देणारा. या दोन्ही प्रक्रिया म्हणजे ज्ञानाच्याच आहेत. पूजा दोन्ही प्रकाराने होऊ शकते. पूजा ही सामुदायिक तन्हेने होऊ शकते किंवा एकट्यानेही करता येते. दोन्हीच्या अटी वेगळ्या, परिणाम वेगळे, पद्धती वेगळ्या.

एकत्रतेत प्रचंड शक्ती, तशी एकांतातही शक्ती आहे.

ध्यान, एकांत म्हणजे फक्त देव आणि भक्त यांची एकाग्रता; फक्त दोन माणसे.

शक्ती देणारं स्थान आणि घेणारं स्थान, ही एक तऱ्हा किंवा शक्ती देणारं स्थान आणि घेणारे कितीही हजारो, लाखो जेवढे जास्त, तेवढे चांगले. ही दुसरी तऱ्हा.

दिव्यांचा लखलखाट; आणि एकदम दिवे गेले ना, की काहीवेळ दिसेनासे होते एकदम. पण काही वेळ गेल्यावर दिसायला लागतं अंधारातही, तसं म्हणून शक्ती घेताना एक काहीतरी निश्चित ठेवा - पूर्ण उजेड किंवा पूर्ण अंधार. प्रचंडता किंवा सूक्ष्मता. यापैकी एका वेळी एकच घ्यावं लागतं. दोन्ही एकावेळी होणार नाही. निसर्गातली वस्तुस्थिती, प्रक्रिया समजून घेतली पाहिजे. मनशक्ती ग्रंथामध्ये वागावे कसे यामधून वरील परिस्थिती उद्धृत केलेली आहे. स्वामी विज्ञानानंद यांनी आपल्या भक्तांना मार्गदर्शन करताना शक्तीच्या दोन तऱ्हा सांगितल्या आहे. जेव्हा सामान्य मनुष्य परमेश्वराचं ध्यान एकाग्रचितांनी करतो तेव्हा त्याच्या जीवनातील अंधकार संपूर्णपणे दूर होऊन, उगवत्या सूर्यप्रकाशाने त्याचे जीवन उजळून निघते. परमेश्वर शाश्वत सत्य आहे. तो जरी दिसत नसला तरी आपण त्याला समजून घेऊ शकतो. समर्थ रामदास स्वामी सुद्धा हेच सांगतात. परमेश्वराच्या नामस्मरणातच आपण आपलं जीवन आनंदी ठेवू शकतो. रामनाम ही अशी एक शक्ती आहे, ज्याच्या एकाग्र नामस्मरणाने मनुष्याच्या जीवनाला मोक्ष प्राप्त होतो. समर्थ रामदास स्वामी राम नामाचे महात्म्य सांगताना कुठलाही क्रोध असो, कुठलाही राग असो तो शांत होतो. थोडक्यात काय तर नामस्मरणाने कोणताही दाह शमतो.

समर्थ रामदास स्वामी खालील श्लोकात म्हणतात की,
तिन्ही लोक जाळू शके कोप येतां।
निवाला हरू तो मुखें नाम घेतां ।।
जपे आदरे पार्वती विश्वमाता ।
म्हणोनी म्हणा तेचि हे नाम आतां ।।

अर्थात राग आल्यावर तिन्ही जगाला जळू शकणारे शंकर हे सुद्धा राम नामाने शांत झाले.

जगतजननी आदिमाता पार्वती ही सुद्धा देवाचे नाम घेत असते. तरी सर्वांनी आता राम नामच घ्यावे.

रामनामाचे श्रेष्ठत्व दर्शवितांना समर्थ पुन्हा पुन्हा श्री शंकराचे उदाहरण देत आहेत, साक्ष देत आहेत. पार्वती मातेची शिवशक्ती हे अद्वैत आहे. 'अर्धनारीनटेश्वर हे शिवशक्तीचे प्रकट रूप. एकात्मता असली तरी पती-पत्नीचे वागणे संसारातील इतर पती-पत्नी प्रमाणेच आहे. त्यांची प्रेमाची भांडणे रंगतात, तसा सारीपाटाचा डावही रंगतो. पार्वतीने डाव जिंकल्यावर नेहमीसारखा रागावणारा पती रानोमाळ भटकतो. तप आचारितो. भिल्लीणीच्या वेषातील पार्वती आपल्या नृत्यविष्काराने त्यांचे मन जिंकीते. अशी ही पार्वती, अंबिका, कालिका, महिषासुरमर्दिनी अशा विविध स्वरूपात पुराणात दिसते. ही विश्वमाता शंकरास आपल्या बुद्धिवादाने जिंकतांना आढळते.

तिलाही रामनामाबद्दल आदर आहे असे श्री समर्थ आपल्याला सांगत आहे.

'निवाला हरू तो हरू' हा उल्लेख शंकरासाठी आहे. तिन्ही लोकांना जाळून टाकण्याचे सामर्थ्य शंकराच्या कोपात-रागात आहे. अशा तीव्र रागाच्या क्षणी भगवान शंकरांना शांत करणे खूप अवघड. मदनाला जाळून टाकण्याचे सामर्थ्य असलेल्या रागाला आवरून घेण्याची शक्ती फक्त रामनामात आहे. राम नामाचे असे अमोघ सामर्थ्य, वारंवार महान शंकराच्या योगाने सांगून समर्थ रामदास स्वामी आपल्या मनाचा ठाव घेत आहेत.

नामस्मरणाची अशी थोरवी भक्ताला रामनाम घेण्यास उद्युक्त करेल असा विश्वास समर्थांना आहे. म्हणूनच त्यांची लेखणी रामनामाची स्तुती करतांना थकत नाही. अथक चालू राहते. अनंत उदाहरणांची ही वाटचाल पुढेही आहेच. रामनाम म्हणण्याचे आणखी एक कारण या श्लोकात समर्थ सांगत आहेत. इथे साक्ष काढली आहे. पार्वतीची ही पार्वती शंकर पत्नी म्हणून येथे न देता विश्वमाता म्हणून येते.

आधी हर असा उल्लेख शंकरासाठी आहे. शिव-शक्ती अशी जोडी समर्थांनी उभी केली आहे. भगवंताच्या नामस्मरणाने कोणाचाही दाह शमतो.

थोडक्यात समर्थ रामदास स्वामी यांनी असे सांगितले आहे की, भगवान शंकर व माता पार्वती ज्या नामाला जपतात, ते नाम सर्वांनी घ्यावे.

खरं पाहता मनुष्य आजच्या या स्पर्धेच्या युगामुळे तामसी प्रवृत्तीचा झाला आहे. क्षणाक्षणाला येणारा राग हे त्या तामसी प्रवृत्तीचं द्योतक आहे. क्षणीक येणाऱ्या रागाचे रूपांतर कधी क्रोधात होईल हे सांगता येत नाही. म्हणून मनुष्याचा नेहमी रागावर ताबा असला पाहिजे. ज्याचा क्रोधावर ताबा नाही, अशा अनेक व्यक्तींचे परिवार, संसार विस्कटलेले आहे. प्रसंगी स्वतःचेही खूप नुकसान झालेले आहे. जर सामान्य माणसाची ही परिस्थिती अस